वृत्तपत्राचे नांव :– गांवकरी

वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :– नाशिक

वृत्तपत्र पान क्र :– 7

दिनांक :–23 / 02 / 2011

# पं. नारायणशास्त्री भानोसे यांचे वृद्धापकाळाने निधन

नाशिक (वार्ताहर)- भारताच्या वैदिक संस्कृतीतील ज्येष्ठ विद्वान श्रौताचार्य पंडित नारायणशास्त्री विनायक भानोसे यांचे काल वृद्धापकाळाने देहावसान झाले. ते ९१ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने वेदातील श्रौत - स्मार्त परंपरेचा देशातील अखेरचा दुवा निखळला आहे.

गेल्या दोन वर्षांपासून ते आपल्या घरीच गुरुकुल पद्धतीने श्रौत- यज्ञ परंपरेचे धडे विद्यार्थ्यांना देत होते. हे कार्य त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत केले. काल रात्री ८.३० वाजता निवासस्थानीच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, दोन मुली, नातू असा परिवार आहे. कै. भानोसे यांची अंत्ययात्रा आज सकाळी ११ वाजता रविवार कारंजा येथील त्यांच्या निवासस्थानापासून निघेल. वेदमूर्ती शांतारामशास्त्री भानोसे यांचे ते काका होत.



वेदभास्कर श्रीकृष्णशास्त्री गोडसे, मीमांसक लक्ष्मीकांतशास्त्री दीक्षित आणि पं. नारायणशास्त्री भानोसे या नाशिकच्या भूषणत्रयींनी गेल्या शतकात आपल्या विद्वत्तेने संपूर्ण भारत गाजवला. कै. भानोसे यांनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत अनेक संस्थानिकांचे राज्याभिषेक केले. शेकडो यज्ञांचे आचार्यत्व संपन्न केले. त्यांचा जन्म १४ ऑगस्ट १९२० रोजी झाला. वयाच्या आठव्या वर्षापासून वे.शा.सं. जगन्नाथ गर्गे, म.म.पं. श्रीधरशास्त्री वारे प्रभृतींच्या सान्निध्यात त्यांनी शुक्ल यजुर्वेद, शतपथ ब्राह्मण, श्रौत- स्मार्त कर्मकांड वगैरेंचे अध्ययन पूर्ण केले. वाराणसीत सोमयागाचे आचार्यत्व करणारे ते महाराष्ट्रातील एकमेव विद्वान समजले जात. वाराणसी, दिल्ली, नेपाळ, तिरुपती, मद्रास, नाशिक येथे झालेल्या अखिल भारतीय वैदिक संमेलनात त्यांनी सहभाग नोंदविला. काशीच्या वेदशास्त्र महाविद्यालयाने त्यांना 'श्रौताचार्य' पदवी देऊन सन्मानीत केले तर कांची कामकोटी शंकराचार्यांनी सुवर्णकंकण बहाल केले होते.

याशिवाय श्री शृंगेरी पीठ, महर्षी सांदिपनी वेदविद्या प्रतिष्ठान, नेपाळ राजे, श्री कैलास मठ नाशिक वगैरे संस्थांनी त्यांना गौरविले होते. गणेशपुरीच्या श्रीगुरुदेव सिद्धपीठाचे यज्ञ संपन्न करण्यासाठी ते दोन वेळा अमेरिकेला जाऊन आले होते. त्यांनी म्हटलेली रुद्राची कॅसेट विदेशातही मान्यता पावली होती. महाराष्ट्रभर त्यांचा शिष्य परिवार विखुरला आहे.